# संविधान (एकशे सहावी सुधारणा) अधिनियम, २०२३

[२८ सप्टेंबर,२०२३.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:-

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास, संविधान (एकशे सहावी सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**अनुच्छेद २३९ कक ची सुधारणा.** २. अनुच्छेद २३९ कक मध्ये, खंड (२) मधील, उप-खंड (ख) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येतील:-

"(ख क) दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत, महिलांसाठी जागा राखून ठेवण्यात येतील.

(ख ख) दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या जागांपैकी, शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(ख ग) दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी (अनुसूचित जातींतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांच्या संख्येसह), शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा, संसद, कायद्याद्वारे निर्धारित करील अशा रीतीने, महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील." .-

**नवीन अनुच्छेद ३३०क समाविष्ट करणे.** ३. संविधानाच्या अनुच्छेद ३३० नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल:-

**लोकसभेत महिलांसाठी जागांचे आरक्षण.** "३३० क. (१) लोकसभेत महिलांसाठी जागा राखून ठेवण्यात येतील.

(२) अनुच्छेद ३३० च्या खंड (२) अन्वये राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येपैकी, शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा, अनुसूचित

जातींतील किंवा अनुसूचित जमातींतील महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) लोकसभेच्या थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी (अनुसूचित जातींतील किंवा अनुसूचित जमातींतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांच्या संख्येसह), शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा, महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.”.

नवीन अनुच्छेद ३३२क समाविष्ट करणे.

४. संविधानाच्या अनुच्छेद ३३२ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल:-

राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी जागांचे आरक्षण.

“३३२ क. (१) प्रत्येक राज्याच्या विधानसभेत महिलांसाठी जागा राखून ठेवण्यात येतील.

(२) अनुच्छेद ३३२ च्या खंड (३) अन्वये राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येपैकी, शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा, अनुसूचित जातींतील किंवा अनुसूचित जमातींतील महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक राज्याच्या विधानसभेच्या थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी (अनुसूचित जातींतील किंवा अनुसूचित जमातींतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांच्या संख्येसह), शक्य होईल तितपत जास्तीत जास्त, एक-तृतीयांश जागा, महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.”.

नवीन अनुच्छेद ३३४ क समाविष्ट करणे.

५. संविधानाच्या अनुच्छेद ३३४ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल:-

महिलांसाठीच्या जागांचे आरक्षण अंमलात येणे.

“३३४क. (१) या भागाच्या किंवा भाग आठच्या पूर्वगामी तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोकसभेत, एखाद्या राज्याच्या विधानसभेत व दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत महिलांसाठी जागा राखून ठेवण्याशी संबंधित असणाऱ्या तरतुदी, संविधान (एकशे सहावी सुधारणा) अधिनियम, २०२३ याच्या प्रारंभानंतर घेतलेल्या पहिल्या जनगणनेची संबद्ध आकडेवारी प्रकाशित करण्यात आल्यानंतर, या प्रयोजनासाठी परिसीमन कार्यवाही हाती घेतल्यानंतर अंमलात येतील आणि अशा प्रारंभापासून पंधरा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर, अंमलात असण्याचे बंद होतील.

(२) अनुच्छेद २३९कक, अनुच्छेद ३३०क व अनुच्छेद ३३२क यांच्या तरतुदींस अधीन राहून, लोकसभेत, एखाद्या राज्याच्या विधानसभेत व दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा, संसद, कायद्याद्वारे निर्धारित करील अशा तारखेपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहतील.

(३) लोकसभेत, एखाद्या राज्याच्या विधानसभेत व दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेत महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांचे आवर्तन, संसद, कायद्याद्वारे निर्धारित करील अशा परिसीमनाच्या प्रत्येक अनुवर्ती कार्यवाहीनंतर अंमलात येईल.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या लोकसभेचे, एखाद्या राज्याच्या विधानसभेचे किंवा दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेचे विसर्जन होईपर्यंत, लोकसभेतील, एखाद्या राज्याच्या विधानसभेतील किंवा दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेतील कोणत्याही प्रतिनिधित्वावर, कोणताही परिणाम होणार नाही.”.

सुधारणेमुळे लोकसभेतील, एखाद्या राज्याच्या विधानसभेतील किंवा दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेतील आरक्षणावर परिणाम न होणे.

६. संविधान (एकशे सहावी सुधारणा) अधिनियम, २०२३ याद्वारे केलेल्या सुधारणांचा, उक्त अधिनियमाच्या प्रारंभास अस्तित्वात असलेल्या लोकसभेचे, एखाद्या राज्याच्या विधानसभेचे किंवा दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेचे विसर्जन होईपर्यंत, लोकसभेतील, एखाद्या राज्याच्या विधानसभेतील किंवा दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या विधानसभेतील कोणत्याही प्रतिनिधित्वावर, परिणाम होणार नाही.

डॉ. रिटा वसिष्ठ,
सचिव, भारत सरकार.